# LIBRARY & INFORMATION CENTRE

## GIT in NEWS

**Pudhari 21-03-2016**

# जीआयटी, केएलई, बीव्हीबी, एचडीएम संघ उपांत्य फेरीत

### व्हीटीयू चषक क्रिकेट स्पर्धा

बेळगाव : प्रतिनिधी

येथील जीआयटी महाविद्यालय आयोजित व्हीटीयू चषक बेळगाव विभागीय क्रिकेट स्पर्धेत आज बीव्हीबीने व्हीटीयूचा केएलईने जैनचा, जीआयटी व एसडीएम धारवाड पराभव करुन उपांत्य फेरीत प्रवेश केला.

व्हीटीयू मैदानावर घेण्यात आलेल्या पहिल्या सामन्यात व्हीटीयू संघाने प्रथम फलंदाजी करताना २३.५ षटकात सर्वगडी बाद ८३ धावा केल्या. मधूसुदनने ४ चौकारासह २४, चंदू देसूरकरने ४ चौकारासह २१ तर रशिदने ११ धावा केल्या. बीव्हीबी तर्फे पवन पी ने १६ धावात ३, विनोद ने ६ धावात २, प्रदिपने २४ धावात २ तर अंकीत व निरंजन यांनी प्रत्येकी १ गडी बाद केला. प्रत्युत्तरादाखल खेळताना बीव्हीबीने १७.१ षटकात ३ गडी बाद ८७ धावा करुन सामना ७ गड्यांनी जिंकला. त्यात गजानने ५ चौकारासह ३५, केतनने १ षटकार ७ चौकारासह ३७ धावा केल्या. व्हीटीयूतर्फे मधुसूदनने २४ धावात ३ गडी बाद केले.

दुसऱ्या सामन्यात केएलईने प्रथम फलंदाजी करताना २४ षटकात सर्वगडी बाद १४९ धावा केल्या. त्यांच्या सी. एच. रविकुमारने ८ चौकारासह ५१, रुद्रगौडा पाटीलने ८ चौकारासह ४८ तर सौरभने २१ धावा केल्या. जैनतर्फे गोलंदाजी करताना वैभवने तीन गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल खेळताना जैन संघाचा डाव २४ षटकात ११५ धावात आटोपला. वैभवने २ षटकार व ७ चौकारासह ३२, विनायकने ४ चौकारासह २३ तर सौरभने २१ धावा केल्या. केएलईतर्फे गोलंदाजी करताना बसवराजने १० धावांत ४ तर सत्यम, अंकीत, अक्षय व रवि यांनी प्रत्येकी १ गडी बाद केले.

जीआयटीवर खेळविण्यात आलेल्या सामन्यात जीआयटी व एसडीएम धारवाड यांनी प्रतिस्पर्ध्यांचा पराभव करुन उपांत्य फेरीत प्रवेश केला.